जिल्हा परिषद, वर्धा
कार्यालय : सामान्य प्रशासन विभाग,
सिव्हील लाईन, वर्धा- 442001

दुरध्वनी क्र. 07152-243211/ 243889 ई-मेल :- dyceogenzpwardha@gmail.com

---

क्र.जिपव/साप्रवि/आस्था-1/प्र.क्र.08/2026 वशि-431 /2026 E-mail द्वारे दिनांक :- 04 मे,2026
सार्वत्रिक बदलीप्रक्रिया सन-2026

प्रति,

------------------------------------ (खातेप्रमुख सर्व),
जिल्हा परिषद, वर्धा

**विषय : जिल्हा परिषदेच्या गट-क व गट-ड च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत.**

1. **जनगणना-2026 च्या अनुषंगाने आपले अधिनस्त सर्व संवर्गातील नियुक्त कर्मचारी यांची माहिती सादर करणेबाबत.**

**संदर्भ** :1.ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.जिपब-414/प्र.क्र.122/आस्था-14,दिनांक 15 मे,2014
2.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र08/2026 वशि-70/2026 दिनांक 10.01.2026.
3.उपसचिव महा.शा.ग्रामविकास विभाग यांचे पत्र क्रमांक,संकीर्ण-1526/प्र.क्र.83/आस्था-14 दि 17 एप्रील,2026
4.या कार्यालयाचे पत्र क्र.जिपव/साप्रवि/आस्था-01/प्र.क्र 08/2026 वशि-395/2026 दिनांक 20 एप्रील,2026

जिल्हा परिषद गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या जिल्हयाअंतर्गत बदलीबाबत संदर्भिय शासन निर्णय दिनांक 15 मे,2014 अन्वये जिल्हाअंतर्गत बदल्या संबंधाने धोरण निश्चित केले असुन त्यात विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वाचे काटेकोरपणे पालन करुन कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रिया समुपदेशनाने दिनांक 05 ते 15 मे या कालावधीतच करणेबाबत निर्देशित आहे.

सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबतची कार्यवाही संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनूसार धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे राबविणेकरीता संदर्भ क्रमांक (01) अन्वये परिपत्रक पारीत करण्यांत आले असुन त्याअनुषंगाने संवर्गनिहाय बदली बाबत वास्तव्य सेवाज्येष्ठता यादया प्रसिध्द करण्यांत आलेल्या आहे.

संदर्भ क्रमांक (03) अन्वये सद्यास्थितीत गृह सचिव,भारत सरकार यांचे निर्देशानुसार जनगणना अधिनियम-1948 आणि जनगणना नियम,1990 अंतर्गत वैधानिक कर्तव्ये सुरळीतपणे पार पाडण्याकरीता जनगणनेच्या कामाशी संबंधित जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड संवर्गातील (जिल्हा परिषदांमधील सर्व शिक्षकांसह) कर्मचाऱ्यांची सन-2026 ची सर्वसाधारण बदली प्रक्रिया करण्यांत येऊ नये असे निर्देशित करण्यांत आले आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भ क्रमांक (04) अन्वये सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 बाबत गट-क व गट-ड मधील जे कर्मचारी जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त करण्यांत आलेले आहे.अशा कर्मचारी यांची सार्वत्रिक बदली प्रक्रिया सन-2026 मध्ये समुपदेशनाचे वेळेस जनणनेसंबंधाने नियुक्त आदेश आणने अनिवार्य करण्यांत येऊन प्रशासकीय/विनंती बदली राबविण्यांत येणार नाही याबाबत सुचित करण्यांत आले तसेच त्याच संवर्गातील (जनगणनेचे कामाशी नियुक्त कर्मचारी वगळता) इतर कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया राबविणेबाबत प्रारुप नियमावली प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

परंतु संदर्भिय पत्र दिनांक 17.04.2026 मध्ये वापरलेला शब्द **'संवग'(कॅडर)** असून तो जनगणनेशी संबंधित आहे. जसे की, शिक्षक, ग्रामसेवक इत्यादी. त्यामुळे काही संवर्गांना जनगणनेचे कोणतेही कामाकरीता नियुक्त करण्यांत आले नसावे जसे की, आरोग्य,पशुसंवर्धन,बांधकाम,कृषी विभागांतर्गत संवर्गातील एकही कर्मचारी हे जनगणनेच्या कामाशी नियुक्त नसल्यास अशा संवर्गातील बदली प्रक्रिया राबविली जाऊ शकते. तथापि, जर त्या संवर्गातील कोणत्याही अधिकाऱ्याला/कर्मचाऱ्याला (अगदी एका व्यक्तीला जरी) जनगणनेचे काम नेमून दिले असेल, तर बदली होईलच असे नाही. कारण बदली प्रक्रिया समुपदेशनाने तसेच वास्तव्य ज्येष्ठतेनुसार राबविली जात असल्याने बदलीचा संवर्गनिहाय साखळी परिणाम होत असतो.

करीता आपले अधिनस्त गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचारी जे आगामी जनगणनेच्या कामाकरीता नियुक्त करण्यांत आले आहे अशा सर्व संवर्गातील **(कॅडरवाईज)** कर्मचारी यांची माहिती **दिनांक** 04/05/2026 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत तात्काळ सामान्य प्रशासन विभागास सादर करावी. जेणेकरुन जनगणनेच्या कामाशी नियुक्त संगर्व हा सार्वत्रिक बदली प्रक्रियेतून वगळण्यांत येऊन इतर संवर्गातील (जनगणनेच्या कामकाजाशी संबंधित नसलेले) बदल्यांबाबत संदर्भिय शासन निर्णयातील वेळापत्रकाप्रमाणे दिलेल्या मुदतीत जिल्हास्तरीय सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन-2026 बाबत (संभाव्य दिनांक 13 व 14 मे,2015 रोजी) जिल्हास्तरीय विभाग/संवर्गनिहाय वेळापत्रक निश्चीत करण्यांत येईल.

तसेच आपल्या विभागातील जनगणनेच्या कामाशी नियुक्त कर्मचारी यांची माहिती (संवर्ग) विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपले अधिनस्त संवर्गातील एकही कर्मचारी हा जनगणनेच्या कामाशी नियुक्त नाही असे गृहीत धरुन त्या संवर्गाची बदली प्रक्रिया राबविण्यांत येईल तसेच तदनंतर होणाऱ्या प्रशासकीय कार्यवाहीस खातेप्रमुख म्हणून आपण स्वत: जबाबदार राहाल.

Parag Soman

**(पराग सोमण,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

मा. प्र. वि. जिल्हा परिषद वर्धा

**प्रतिलीपी** :

1. **मा.विभागीय आयुक्त,नागपूर विभाग,नागपूर यांना माहितीस्तव सादर.**
2. **मा.जिल्हाधिकारी,वर्धा यांना माहितीस्तव सादर**
3. **अपर आयुक्त (आस्थापना),नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव.**
4. **जिल्हा प्रकल्प संचालक,ग्रामिण विकास यंत्रणा,वर्धा**
5. **अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, वर्धा**
6. **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),जिल्हा परिषद,वर्धा**
7. **गट विकास अधिकारी, पंचायत समिती ------------(सर्व)**

   संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनूसार गविअ यांनी आपले अधिनस्त ज्या संवर्गातील कर्मचारी यांचे जनगणने कामी नियुक्त करण्यांत आले नाही अशा संवर्गातील कर्मचारी यांचे तालुकास्तरीय प्रशासकीय /विनंती बदली पात्र कर्मचारी यांचे सार्वत्रिक बदली प्रक्रियेबाबत तालुकास्तरावर कार्यवाही करावी.
8. **जिल्हा परिषद, वर्धा नोटीसबोर्ड तसेच जिल्हा परिषद,वर्धा संकेतस्थळावर प्रसिद्धीकरीता.**

Parag Soman.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**